DISTRICT AND SESSIONS COURT, WARDHA

Civil Lines, Sewagram Road, Wardha 442001

Web– https://wardha.dcourts.gov.in Email – mahwardc@mhstate.nic.in

---

जा.क्र. ६५९४/स.अ./रो.व.वि.वि/निविदा/२०२५ दिनांक २४/१२/२०२५

दरपत्रक / निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील जुनी व नविन इमारतीमध्ये व परिसरामध्ये स्थापीत असलेले ५२ नग सीसीटीव्ही कॅमेरेचे खालीलप्रमाणे दुरुस्ती व देखभालीचे कार्य दोन वर्षाकरीता करावयाचे आहे.

Sr. No.	Name of Article
1	CCTV Cameras Troubleshooting
2	CCTV Node Repairing
3	Cable Tracing
4	Defective Cameras Repairing or replacement
5	8 port POE switch Repairing or replacement
6	16 port POE switch Repairing or replacement

सदर कार्याकरीता साईटची पाहणी निविदेच्या कालावधीत कार्यालयीन वेळेमध्ये करता येईल. याकरीता जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे संपर्क करता येईल.

सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक ०३ जानेवारी, २०२६ चे कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत **खालील विवरणाप्रमाणे व नमुद अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रक** जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे बंद लिफाफ्यामध्ये सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त होणा–या मोहरबंद निविदा/दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही, याबाबत नोंद घेण्यात यावी.

अटी व शर्ती :–

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर "**CCTV वार्षिक करार दरपत्रक**" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ती खालील नमुन्यातच जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे सादर करावीत.

Sr. No.	Name of Article	Qty	Rate	Applicable GST/CGST Rate	Total Amount (4 +5)
1	2	3	4	5	6
1					

२. दरपत्रकातील/निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहीत तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमुद करावे. सदरील दर हे दरपत्रक स्विकारल्यावर २ वर्षासाठी अस्तित्वात राहतील.

३. सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्तीचे कार्य करण्याकरीता पुरविण्यात येत असलेले सर्व साहित्य नामांकित कंपनीचे असणे आवश्यक असुन ISI मार्कचे असणे आवश्यक आहे.

४. वरिलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार निविदा सादर करण्यात आले नाही किंवा निविदा मंजुरीनंतर पुरवठा होत असलेले सयंत्रे ISI मार्कचे आढळून आले नाही तसेच निविदा प्रमाणे कार्य करण्यात आले नाही अशापरिस्थितीत कंत्राटदार यांची निविदा रद्द करण्यात येईल.

५. न्यायालयीन परिसर हा अतिशय संवेदनशिल असल्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे सतत कार्यान्वीत असणे आवश्यक असुन सीसीटीव्ही कॅमेरेचे बिघाडाबाबत जिल्हा न्यायालय, वर्धा यांचेकडून कंत्राटदार यांचेकडे तक्रार प्राप्त होताच तक्रारीचे निराकरण त्याच दिवशी करणे अनिवार्य राहील. सदर कामाकरीता जिल्हा न्यायालय, वर्धा येथे उपस्थित राहण्याकरीता कोणताही खर्च अनुज्ञेय राहणार नाही. सदर अटीची नोंद व हमी निविदेमध्ये नमुद करणे बंधनकारक राहील याबाबत कंत्राटदार यांनी नोंद घ्यावी.

६. कोणतेही दरपत्रके/निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके/निविदा नाकारण्याचा हक्क जिल्हा न्यायालय, वर्धा हे राखून ठेवीत आहे.

७. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

८. सदरील करार सुचनेचे पालन न केल्यास कोणत्याही टप्यावर, कोणत्याही क्षणी अथवा करार सुंपष्टात आणण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाने राखून ठेवले आहे.

९. वार्षिक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकाचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे करार जसे की, GST, Income Tax etc. दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधित व्यावसायिकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधितास अदा करण्यात येणार नाहीत.

१०. दरपत्रक/निविदा लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.

आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

११. सदरची जाहिरात जिल्हा न्यायालय, वर्धा संकेतस्थळावर (https://wardha.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

दिनांक :– २४/१२/२०२५

प्रतिलीपी :–

१. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रकाशीत करण्याकरीता

२. तहसिल कार्यालय, नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस फलकावर प्रकाशीत करणेकरीता